International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# पंचायत राज आणि ग्रामीण विकास

प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे

संत गाडगे बाबा कला महाविद्यालय सिंदखेड राजा जि. बुलडाणा

-----------------------------------------------*****************-----------------------------------------------

**सारांशः**

21 व्या शतकात लोकशाही व्यवस्था आदर्श व्यवस्था मानली जाते. म्हणून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्था स्विकारली. लोकशाही शासन व्यवस्थेच्या माध्यमातून कोणत्याही भेदभावाशिवाय भारतीय नागरीकांना समान हक्क दिला. तसेच सत्तेच्या विकेंद्रीकरणाची संस्कृती राबविण्याकरीता पंचायतराज व्यवस्थेचा अवलंब केला. ग्रामीण जनतेचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही, हे तत्कालीन सत्तेतील धुरंधरांना कळले होते. म्हणून पंचायत राज योजना अंमलबजावणी करून ग्रामीण विकासाच्या योजना राबविण्यास सुरूवात केली. यशापयशाच्या हिंदोल्यावर झुहस ही योजना ब-यापैकी यशाची शिखरे गाठत आहे. ग्रामीण भागत नवचैतन्य निर्मितीस व आर्थिक सामाजिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, तांत्रिक विकास करण्यास यशस्वीरितीने मार्गक्रमने करीत आहे. ग्रामीण नेतृत्वाचा विकास झाला. महिला सक्षमीकरणाने कुटूंब व गावांचा विकास होण्यास मदत झाली.

**प्रस्तावनाः**

पंचायत राज व्यवस्थेचा परिचय भारताकरीता नवीन नाही. फार प्राचीन काळापासून असल्याचे संदर्भ ऐतिहासिक दस्तऐवजातून आणि प्राचीन ग्रंथातून सापडतात. परकीयांच्या आक्रमनामुळे या संस्था मोडकळीस आल्या. इंग्रज राजवटीत मोडकळीस आलेल्या संख्या नष्ट केल्या व न्याय आणि कारभाराविषयक सत्ता सरकारी अधिका-यांच्या

हातीकेंद्री झाली. ग्रामीण उद्योगधंदे बुडाले व ग्रामीण जनता शहराकडे धावू लागली. स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला मार्ग दाखवून ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. त्यातून पंचायतराज व्यवस्थेत मुलभूत व व्यापक अर्थ प्राप्त झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 2 ऑक्टोबर 1957 रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी पंचायत राज व्यवस्थेचे रितसर उद्घाटन केले. याला 73 व 74 घटना दुरूस्तीने विशेष महत्व प्राप्त झाले आणि तिथून ख-या अर्थाने पंचायत राज व्यवस्थेद्वारा ग्रामीण विकास योजना राबविण्यास सुरूवात झाली. नियोजनबधद अर्थव्यवस्था राबविण्याकरीता व सर्वांगीण विकास करून घेण्याकरीता सकल नागरीकांचा सहभाग आवश्यक असते त्याकरीता सशक्त नागरीक निर्मितीकरीता आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक,शैक्षणिक, विकास घडविण्याच्या दृष्टीने अनेक योजना ग्रामीण पातळीवर राबविण्यात आल्या व त्याची फलश्रृती म्हणून आज भारताची लोकशाही शासन व्यवस्था सुदृढपणे वाटचाल करीत आहे.

**पंचायत राज वृयवस्थेचा पूर्व इतिहासः**

भारतात वेदकाळापासून गावातील हूशार, अनुभवी, आदरणीय अशा पंच मंडळींनी ग्रामीण समस्या समजून घेवून मार्गदर्शन करणे, वाद व भांडण तंटे सोडविणे, गांव विकासाकरीता योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करून राजाला खंड वसुली देणे इत्यादी कार्य गावातील पंच मंडळी पार पाडत असे. गावकरी सुध्दा त्यांच्या निर्णयाचा मान राखत होते. पंचमंडळीत गावातील वयोवृध्द व चारित्र्यसंपन्न पुरूष असत. आजच्या निर्वाचीत लोकशाही व्यवस्थेचे स्वरूप त्याला कधीच नव्हते, असे असले तरी संस्कृती संवर्धन व संरक्षणाचे आणि स्वयंपूर्ण, स्वंयशासीत समाज निर्मितीचे कार्य त्यांच्याकडून केल्या गेले. मौर्य काळात ग्रामशासनाचा अधिकार होता. सन 800 ते 1000 च्या दरम्यान

एकब येथील चौदा शिळा ख-या ग्रामपंचायतीच्या निदर्शक आहेत. आजच्या प्रमाणे तेव्हाच्या ग्रामपंचायतीही कार्य करीत होत्या. ही पध्दत रसतेच्या सोईची आहे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनीही पूर्वी प्रमाणेच चालु ठेवली, मोगलांनीही ही पध्दती स्विकारली. ब्रिटिशांच्या आगमनानंतर आपल्या स्वार्थाकरीता त्यांची प्रचलीत व्यवस्था मोडून पोलीस पाटील पासून जिल्हाधिका-यापर्यंतची नोकरशाही फौज उभी केली. सन 1882 पासून लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात भारताच्या नवनिर्माणाचा विचार समोर आला‌ महात्मा गांधीजींनी खेड्याकडे जाण्याचा मार्ग दाखवून ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना नवा मुलभूत व व्यापक अर्थ प्राप्त झाला. म्हणजे पंचायत राज व्यवस्था ग्रामीण भारताची स्थानिक स्वशासन प्रणाली होय. ही त्रीस्तरीय योजना आहे. ग्राम, ब्लॉक व जिल्हा स्तरावर यांच्याद्वारे आर्थिक विकास करणे सामाजिक न्याय संकल्पना मजबूत करणे, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करणे, तसेच घटनेच्या 11 व्या अनुसुचीत नमूद 29 विषयाचा यात सहभाग आहे. आधुनिक भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू द्वारा राजस्थान मधील नागौर जिल्ह्यातील बगधरी गावात 2 ऑक्टोबर 1959 रोजी या योजनेचे उद्घाटन केले.73 व 74 व्या घटना दुरूस्तीने याला विशेष म ाहत्व
प्राप्त झाले.

**ग्रामीण विकासाचा अर्थः**

ग्रामीण विकासाच्या समस्येचे स्वरूप विविध आहे. आर्थिक व्यवसायाचा विकास, सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टीकोनात बदल घ ाडविणे आणि शिक्षण, आरोग्य सारख्या सामाजिक गरजांचा व

सुविधांचा विकास करणे होय. जगात सर्वच शहरांचा सतत विकास व भरभ ाराट होत असून सुध्दा 1950 मध्ये 79 टक्के जनता (नागरीक लोक संख्येपैकी) खेड्यात राहत होती. भारतात 1961 मध्ये 82 टक्के तर 1971 मध्ये 80.1 टक्के जनता खेड्यात आहे. म्हणूनच आर्थिक नियोजनामध्ये राष्ट्रीय विकास साधण्याकरीता ग्रामीण विकास आवश्यक ठरतो‌ कारण देशाच्या विकासाची व समृध्दीची फळे देशातील अगदी तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. तसेच तळागाळातील शेवटच्या घटक विकास प्रक्रीयेत सहभागी असणे आवश्यक आहे. गामीण भागातच अन्नधान्य व कच्चा माल निर्माण होतो त्यातूनच शहरी गरजा पूर्ती होत असते. शिवाय शहरी उद्योगधंद्यांला श्रमीक पुरवठा सुध्दा ग्रामीण भागातूनच होते.नैसर्गीक साधन संपत्तीची विपुलता तेथेच आहे. समाजातील मातृशक्ती, सज्जनशक्ती, संतशक्ती संघशक्ती आणि युवाशक्तीच्या माध्यमाने जलसंपदा, जंगल-वनसंपदा, जमीन, भूसंपादन, जनावर, जैवविविधता-संपदा, ऊर्जासंपदा आणि जलसंपदातील प्रत्येक घटकांचा सहभाग,विचार घेवून करण्याची पर्यावरणपूरक शाश्वत विकास प्रक्रिया आहे.

ग्रामीण समाजात उपलब्ध असलेल्या भौतिक आणि मानविय साधन संपत्तीचा पुरेपुर उपयोग करून शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, आहार, नि वास, संस्था व संघटना इत्यादी विविध क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे व त्याद्वारे ग्रामीण लोकांचे विशेषतः दूर्बल घटकाचे जीवनमान त्यांच्या सक्रीय सहभागाद्वारे उंचावणे म्हणजे ग्रामीण विकास होय. पंचायत राज वयवस्थेने ख-या अर्थाने गावांना आत्मनिर्भर केले. गावातील समस्या व त्या उपाय शोधण्याचे साधन ग्रामसभेत दिल्यामुळे गावात चैतन्य निर्माण होवून ख-या अर्थाने लोकशाही आली. पंचायत राज व्यवस्थ◌ेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण गावातील शेवटच्या घटकापर्यंत

पोहचले त्यातून प्रत्येक व्यक्ती शासन प्रक्रियेत सहभागी होवू लागला. त्यामुळे प्रत्येक नागरीकांना गावातील सरकार निवडून देण्याचे स्वातंत्र्य मिळाले. विकासगंगा घराघरापर्यंत नेण्याची एक प्रभावी व्यवस्था निर्माण झाली. पंचायत राज व्यवस्थेमुळे आज अनेक योजनांद्वारे ग्रामीण भागाचा विकास करण्यात येत आहे. यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कोशल्यवृध्दी प्रशिक्षण व वेलची रोजगार विशेष प्रकल्प, महिला किसान यशस्वीकरण परियोजना, अटल विश्वकर्मा सन्मान योजना, अन्नासाहेब पाटील आर्थिक मागास विकास कार्यक्रम, अ.जा. बचत गटांना कुक्कुटपालन व्यवसाय करण्याकरीता आर्थिक मदत, आदर्श गांव संकल्प व प्रकल्प, आम आदमी विमा योजना, आमदार आदर्श ग्रामयोजना, इंदिरा आवास योजना, इमारतीच्या छतावरील पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प, खादी व ग्रामोद्योग, उद्योगाची संधी, ग्रामसभा पुरस्कार, ग्रामीण आवास योजना, उन्नत महाराष्ट्र अभियान योजना, ग्रामीण स्वयंरोजगार योजना, दिनदयाल उपाध्याय कौशल्य योजना, विकास, पंचायत राज क्षमता बांधणी, पंतप्रधान ग्राम सडक योजना, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजगता विकास अभियान, बाळासाहेब ठाकरे समृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना, मनरेगा इत्यादी योजना ग्रामीण विकासाकरीता राबविण्यात येत आहेत.

**योजनांची यशश्वीताः**

ग्रामीण भागात रस्त्यांची सुविधा निर्माण झाल्यामुळे गावातील कच्चा माल शहरी बाजारपेठेत नेणे अगदी सोपे झाले आहे. त्यामुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती मजबुत होण्यास मदत◌ा होत आहे. रोजगार उपलब्ध नसल्यामुळे विविध कौशल्य शिक्षण घेवून स्वतंत्र उद्योग व्यवसाय करण्याची चालना मिळाली आहे. महिलांना राजकारणात आरक्षण

मिळाल्यामुळे महिला सशक्तीकरण घडून आले आहे. अनुसुचीत जाती जमातींना स्वतंत्र व्यवसाय करण्याची संध उपलब्ध झाली आहे. गावाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आदर्शगांव संकल्प व प्रकल्प उत्तम आहे. ग्रामीण भागात असलेल्या भूमिहीन कुटूंबातील कर्त्या पुरूषाचे अकाली निधन झाल्यास कुटूंबाची वाताहात होवू नये म्हणून आम आदमी विमा योजनेचा हातभार लागला आहे. बेघर लोकांना स्वमालकीचे घर असावे याकरीता इंदीरा आवास योजना प्रचंड मदत करीत आहे. विजेची उणिव भरून निघण्याकरीता स्वतःच्या इमारतीच्या छतावर सौर विद्युत प्रकल्प योजना अंमलात आणून स्वतः विजेची गरज पूर्ती करता येते. खादी ग्रामोद्योगाच्या अनेक योजना राबवून ग्रामीण भागातील बरेच युवक स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक उन्नती करीत आहेत व त्यातून रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटांच्या वसतुकरीता विक्री व्यवस्था व प्रदर्शनी, पदाधिकारी व अधिका-यांच्या सभा व बैठकीकरीता स्वतंत्र व्यवस्था, प्रशिक्षण कालावधीत निवासाची व्यवस्था ग्राम विकास भवनामुळे पूर्ण होत आहे. अकुशल रोजगार ग्रामीण भागात उपलब्ध असते याद्वारे अकुशल युवकांना रोजगाराच्या संधी मनरेगा मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण अकुशल युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. गावापासून 5 कि.मी. च्या आत रोजगार, अकुशल रोजगार

उपलब्ध न केल्यास मजुरीच्या 25 टक्के दैनिक बेरोजगार भत्ता, महत्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नोंदणीकृत प्रौढ व्यक्तीला रोजगार नसल्यास अकुशल रोजगाराला हक्क, महिला उद्योजकांकरीता विशेष धोरण, मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांकरीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, वाड्या, वस्त्यांना

जोडण्याकरीता मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, पिण्याकरीता शुध्द पाणी मिळावेयाकरीता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना, शेतकरी, शेतमजुरांना आपल्या मुलीचे लग्न कमी खर्चात करता यावे म्हणून शुभमंगल सामुहिक विवाह योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, ग्रामीण भागातील गांव समुहांना आर्थिक, सामाजिक, भौतिक विकास करण्यासह त्यांना शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी शामा प्रसाद मुखर्जी रूरबन अभियान योजना, सौभाग्य योजना, अशा विविध योजना पंचायत राज मार्फत ग्रामीण भागाकरीता राबविण्यात येत आहेत व त्यातून ग्रामीण विकास होतांना दिसून येते.

**ग्रामीण विकास योजनेतील उणिवाः**

ग्रामीण विकासाच्या योजना राबवून प्रगती होत आहे हे जरी सत्य असले तरी त्यात काही उणिवा सुध्दा आहेत. तपासणी करीता येणा-यांना खुष करण्याची पध्दत हे अंमलबजावणीतील अपयश झाकण्याची पध्दत आहे. प्रत्यक्ष कार्य करण्यापेक्षा कामाचे भपकेबाज सादरीकरण करण्यावर भर देण्यात येणे, याकरीता योजनांचा पैसा खर्च होते. अधिकारी व कर्मचा-यांना आपल्या कार्याप्रती किती स्वायत्तता आहे हाही प्रश्न महत्वाचा आहे. सत्ताधा-यांना सांभाळत त्यांना कामे करावी लागतात, हे वास्तव नाकारता येत नाही. दबाव, अपेक्षा आणि टार्गेट अशा परिस्थीतीत कामे करणे कठीण जावे, कामे करतांना, कौशल्याचा वापर होत नाही, कार्यतत्परता दाखविली जात नाही, चांगला शेरा मिळवून नोकरी वाचविणे हा उद्योग सुरू असतो. पंचायत राज व्यवस्थेतून ग्रामीण विकास साध्य करून घेण्याकरीता देखावा करण्याची प्रवृत्ती नाहीशी होणे आवश्यक आहे. विकास कामाकरीता आलेला निधी योग्यरितीने योजनेवर वेळेत खर्च होईल अशी व्यवस्था कार्यान्वीत असावी लागेल. नवीन सत्ता संघर्षाला

वाव मिळत आहे. विशिष्ट घटकांना आर्थिक लाभ, रचनात्मक कार्याकडे दूर्लक्ष, भ्रष्टाचार व दप्तर दिरंगाई.

**निष्कर्षः**

पंचायत राज व्यवस्थेद्वारा राबविलेल्या ग्रामीण विकासाच्या योजनांची फलश्रृती निश्चित दखल घेण्याइतपत चांगली आहे. ग्रामीण भागातील श्रमशक्तीला आर्थिक प्रक्रियेच्या प्रवाहात सामिल करून घेण्यास ग्रामीण विकास विभाग पूर्णतः अपयशी झाला नाही, ग्रामीण जनतेच्या विधायक शक्तीला अविष्कृत करून योग्य वळण देण्यास यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागात विविध योजनांच्या पर्यायामुळे कौशल्य निर्माण करून लघू उद्योग, कुटीर उद्योग, स्वयंरोजगार, कुक्कूटपालन व तत्सम इतर योजनेच्या माध्यमातून गावातील तरूणाला गावातच रोजगार मिळवून दिला त्यातच मनरेगाच्या कार्यामुळे गावाकडून शहराकडे होणारे स्थलांतर रोखण्यास मदत झाली आहे. ग्रामीण स्त्रीशक्तीचे रूपांतर सत्तेत व योजना राबविण्यात केल्यामुळे राजकीय सहभागातून महिला सशक्तीकरण व त्यातून कुटूंब गांव, शहर, राज्य व देश सदावत होण्याचा मार्ग मोकळा झाला. विपूल प्रमाणात असलेल्या ग्रामीण मानवी शक्तीचा विकास कार्यात सहभाग करून घेण्यास यश मिळाले आहे. महिलांच्या राजकीय सहभागामुळे ग्रामीण समस्या सोडविण्यास मदत होत आहे. शेती, पशुपालन, आरोग्य व ग्रामसफाई, शिक्षण तसेच समाज शिक्षण, प्रौढ शिक्षण, संचार साधन, सहकार, लघु उद्योग, कुटीर उद्योग मागासलेल्या त्यांचा विकास, आवासीय योजना इत्यादीमुळे ग्रामीण

विकास होत आहे. जनसामान्यांचा सत्ते सहभाग वाढला आहे. यातुनच ग्रामीण नेतृत्व उदयास येवून स्वराज्य संस्थांना बळकटी येत आहे. ग्रामीन समाजात राजकीय जागृती होत आहे. राजकीय जाणीव निर्मितीमुळे आपले हक्क पदरात पाडून घेण्याचे प्रयत्न होत आहेत. उपेक्षित घटकांना महत्व प्राप्त होवून काही प्रमाणात सत्तेत सहभाग मिळाला. राजकीय सहभागाचे प्रमाण वाढले. स्थानिक उपक्रमशिलतेला वाव मिळाला. ग्रामीण जनतेच्या मानसिकतेत बदल होतांना दिसते आहे.

## संदर्भ सूचीः

[1]. https://mt.vikaspedia.in
[2]. https://www.mpsckido.com
[3]. https://vishwakosh.marathi.gov.in
[4]. https://idd.maharashtra.gov.in
[5]. https://niidpi.org.in
[6]. भारताचे शासन आणि राजकारण, डॉ. भा.ल. भोळे, पिंपळापुरे व कं. नागपुर
[7]. पंचायत राज, डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लीकेशन जळगांव
[8]. भारतीय शासन आणि राजकारण, डॉ. अलका देशमुख, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर
[9]. स्त्री आणि राजकारण, डॉ. प्रशांत अमृतकर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद